आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र -संध्याकाळी ७.०० वाजता

२२डिसेंबर २०२४ - रविवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- सरकारी नोकरीत निवड झालेल्या ७१ हजारांहून अधिक उमेदवारांना उद्या प्रधानमंत्री नरेंद्र मोदी नियुक्तीपत्रं प्रदान करणार

- विधानसभा निवडणुकीत झालेला पराभव न पटल्यानं महाविकास आघाडी ईव्हीएमवर बोलत असल्याची उपमुख्यमंत्री अजीत पवार यांची टीका

- १९ वर्षांखालच्या मुलींच्या आशिया चषक क्रिकेट स्पर्धेच्या अंतिम सामन्यात बांगलादेशाला नमवून भारतानं पटकावलं विजेतेपद

**आणि**

- महिला क्रिकेटमधे, पहिल्या एकदिवसीय सामन्यात भारताचं वेस्ट इंडिजपुढं विजयासाठी ३१५ धावांचं आव्हान

**<><><><><>**

देशभरात विविध सरकारी मंत्रालये आणि विभागांमध्ये नोकरीसाठी निवड झालेल्या ७१ हजारांहून अधिक उमेदवारांना प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या दूरदृश्य प्रणालीद्वारे नियुक्तीपत्र प्रदान करणार आहेत. यावेळी ते उमेदवारांना संबोधितही करणार आहेत. रोजगार मेळावा हा प्रधानमंत्र्यांच्या रोजगार निर्मितीला सर्वोच्च प्राधान्य देण्याच्या वचनाची पूर्तता करण्याच्या दिशेनं एक पाऊल आहे. हा उपक्रम युवकांना राष्ट्रनिर्माणाबरोबरच आत्मनिर्भर होण्याची संधी उपलब्ध करून देईल, असं सरकारतर्फे कळवण्यात आलं आहे. हा रोजगार मेळावा देशभरात ४५ ठिकाणी आयोजित केला जाणार आहे. केंद्र सरकारच्या विविध मंत्रालयें आणि विभागांसाठी भर्ती केली जात आहे. देशभरातून निवडलेले नवे उमेदवार गृह मंत्रालय, टपाल

कार्यालय, उच्च शिक्षण विभाग, आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालय, वित्तीय सेवा विभाग यांसारखी विविध मंत्रालये/विभागांमध्ये नियुक्त होतील.

**<><><><><>**

राज्य विधानसभा निवडणुकीत झालेला पराभव महाविकास आघाडीला पचला नाही, म्हणून त्यांनी ईव्हीएमवर प्रश्नचिन्ह उपस्थित केलं, अशी टीका राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष अजित पवार यांनी केली आहे. बारामती इथं आज त्यांचा सत्कार करण्यात आला, त्यावेळी ते बोलत होते. लोकसभेतल्या निकालाबद्दल महायुतीनं ईव्हीएमला दोष दिला नाही, अशी आठवण त्यांनी करून दिली. बारामतीच्या मतदारांनी एक लाखापेक्षा जास्त मतांच्या फरकानं आपल्याला निवडून दिलं, त्यामुळे आपल्यावरची जबाबदारी वाढली आहे, असं सांगून बारामतीच्या विकासासाठी आपण वचनबद्ध असल्याची ग्वाही अजित पवार यांनी दिली.

**<><><><><>**

नागपूर इथं झालेल्या विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर विस्तारित मंत्रिमंडळाचा शपथविधी आणि खातेवाटप झाल्यानंतर आज आपापल्या जिल्ह्यात पोचलेल्या मंत्र्यांनी महत्वाच्या योजना आणि कामं मार्गी लावण्याची ग्वाही दिली.

जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी आज अहिल्यानगरमधे जेष्ठ समाजसेवक पद्मविभूषण आण्णा हजारे यांना भेटून त्यांचे आशिर्वाद घेतले. मुख्यमंत्र्यांनी जलसंपदा विभागाच्या अतिशय महत्वाच्या खात्याची जबाबदारी सोपवल्यामुळे कोकणात वाहून जाणारं पाणी गोदावरीच्या तुटीच्या खोऱ्यात आणण्याचं स्वप्न पूर्ण करण्याची संधी मिळाली असल्याचं त्यांनी बातमीदारांशी बोलताना सांगितलं. कृष्णा खोऱ्यातल्या पाणी प्रश्नाबाबतही निश्चित असं धोरण

ठरवावं लागेल. बिगर सिंचनाचं वाढतं प्रमाण, शेतीच्या पाण्याचे निर्माण होणारे प्रश्न , पाण्याची उधळपट्टी थांबवणं आणि पाणी सोडण्याच्या वितरण व्यवस्थेत चांगली सुधारणा करणं, यासाठी आता काम करावे लागेल, असं विखे पाटील म्हणाले .

शालेय शिक्षण मंत्री आणि मालेगाव बाह्यचे आमदार दादा भुसे आज मालेगावला गेले, तेव्हा त्यांचं जोरदार स्वागत करण्यात आलं. यावेळी बोलताना, शालेय शिक्षण खात्यातही प्रभावी कामगिरी करणार असल्याचं त्यांनी सांगितलं. गरीबातल्या गरीब मुलांना चांगलं आणि उत्तम शिक्षण देणं हे ध्येय असल्याचंही ते म्हणाले.

समाजात सलोखा निर्माण होण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचं सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी सांगितलं. ते आज छत्रपती संभाजीनगर इथं वार्ताहरांसी बोलत होते. बीड आणि परभणी इथं घडलेल्या घटनांचा बारकाईने अभ्यास करून सत्य परिस्थितीचा अहवाल मुख्यमंत्र्यांकडे सादर करणार असल्याचंही शिरसाट यांनी सांगितलं.

बहुजन विकास, नवीकरणीय ऊर्जा आणि दुग्धविकास मंत्री अतुल सावे यांचं आज छत्रपती संभाजीनगरमध्ये जल्लोषात स्वागत झालं. त्यानंतर सावे यांची मिठाईनं तुला करण्यात आली.

**<><><><><>**

ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे आणि पद्मश्री पोपटराव पवार यांच्यासारखे प्रेरणापुरुष आणि समाजपुरुष यांची उपस्थिती प्रेरणादायी असल्याचं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी केलं. पोपटराव पवार यांच्या मुलाच्या लग्नाला अहिल्यानगर इथं उपस्थिती लावल्यानंतर ते बोलत होते. यावेळी हिवरे बाजार ग्रामस्थांकडून फडनवीस यांना मानपत्र देण्यात आलं.

<><><><><>

अमरावती जिल्ह्यात बडनेरा इथं उभारण्यात येणाऱ्या IIMC अर्थात भारतीय जनसंचार संस्थेच्या उभारणीसाठी निविदा मागवल्या जात असून २७ डिसेंबरपर्यंत निविदा दाखल करता येतील असं माहिती आणि प्रसारण मंत्रालयाचे सचिव संजय जाजू यांनी सांगितलं. नागपूर इथं आकाशवाणी, दूरदर्शन, पत्र सूचना कार्यालय, केंद्रीय संचार ब्युरो या कार्यालयाच्या प्रमुखांची बैठक झाली, यावेळी जाजू बोलत होते. केंद्रीय लोक निर्माण विभाग नागपूरचे मुख्य अभियंता प्रदीप दीक्षित यांच्याकडून जाजू यांनी IIMC च्या बांधकामाचा आढावा घेतला. इमारतीच्या बांधकामासाठी etender.cpwd.gov.in या संकेतस्थळावर निविदा पाठवाव्यात, असं आवाहन त्यांनी केलं.

<><><><><>

१९ वर्षांखालच्या मुलींच्या आशिया चषक क्रिकेट टी-ट्वेंटी स्पर्धेच्या अंतिम सामन्यात भारतानं बांग्लादेशाला ४१ धावांनी पराभूत करत विजेतेपद पटकवलं आहे. भारतीय महिला संघानं या स्पर्धेतले सर्व सामने जिंकत दणदणीत विजय मिळवून इतिहास घडवला. मलेशियातल्या क्वालालंपूर इथं आज सकाळी झालेल्या या सामन्यात, बांग्लादेशनं नाणेफेक जिंकत प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. भारतानं प्रथम फलंदाजी करत २० षटकांत सात बाद ११७ धावा केल्या. गोंगाडी त्रिशा हिनं ४७ चेंडूत ५२ धावा केल्या. विजेतेपदासाठी ११८ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना, बांगलादेशचा संघ १८ षटकांत ७६ धावांवर गारद झाला. भारताकडून आयुषी शुक्लानं तीन बळी घेतले, तर परुनिका सिसोदिया आणि सोनम यादव यांनी प्रत्येकी दोन बळी घेतले. त्रिशा हिला सामनावीर आणि मालिकावीर असे दोन्ही किताब देण्यात आले.

<><><><><>

महिला क्रिकेटमधे, वडोदरा इथं सुरु असलेल्या पहिल्या एकदिवसीय सामन्यात भारतानं वेस्ट इंडिजपुढे विजयासाठी ३१५ धावांचं आव्हान ठेवलं आहे. वेस्ट इंडिजनं नाणेफेक जिंकून भारताला प्रथम फलंदाजीसाठी पाचारण केलं. भारतानं निर्धारित ५० षटकात, ९ गडी गमावून ३१४ धावा केल्या. स्मृती मंधनाचं शतक हुकलं. तिनं ९१ धावा केल्या. प्रतिका रावळ ४०, हार्लिंग देओल ४४, हरमनप्रीत कौर ३४, तर रिचा घोषनं १३ चेंडूत २६ धावांचं योगदान दिलं. वेस्ट इंडिजतर्फे जैदा जैम्सनं ५ बळी टिपले.

**<><><><><>**

नवी मुंबई इथं आज झालेल्या स्वच्छ नवी मुंबई हाफ मॅरेथॉन स्पर्धेत सहा हजारांहून अधिक नागरिकांनी सहभाग घेतला. महानगरपालिका आयुक्त कैलास शिंदे यांनी २१ किलोमीटर अंतर पार करत स्वच्छतेचा संदेश दिला. मॅरेथॉनमध्ये दीडशेहून अधिक तृतीयपंथीय, ५० हून अधिक दिव्यांग, पाचशेहून अधिक विद्यार्थी सहभागी झाले होते.

**<><><><><>**

पालघर जिल्ह्यातल्या वाडा तालुक्यामधल्या खानिवली ग्रामपंचायतीनं प्लास्टिक घनकचरा व्यवस्थापनासाठी एक नाविन्यपूर्ण उपक्रम सुरु केला आहे. त्यात, गावात कचरा स्वरुपात पडलेल्या, दुकानांमधे पडलेल्या प्लास्टिकच्या बाटल्या गोळा करून बॉटल श्रेडर मशीनमधे त्या क्रश केल्या जातात. त्यापासून तयार झालेले फ्लेक्स बाजारात विकून महिन्याला ४० ते ५० हजारांचं आर्थिक उत्पन्न मिळू शकेल. कानिवलीचे सरपंच भरत हजारे यांनी गावातल्या कचरा नियोजनाबद्दल सांगितलं....

**होल्ड - बाईट - भरत हजारे**

**<><><><><>**

येणाऱ्या काळात भारत आणि कुवेत यांचे संबंध अधिक वृद्धिंगत होतील, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. मोदी यांनी आज कुवेत दौऱ्यात कुवेतचे अमीर शेख मेशल अल-अहमद अल-जबेर अल-सबाह यांच्यासोबत औषधनिर्माण, माहिती-तंत्रज्ञान, फिन टेक, पायाभूत सुविधा आणि सुरक्षा अशा प्रमुख क्षेत्रातील द्विपक्षीय सहकार्याबाबत चर्चा केली. दोन्ही नेत्यांनी या भेटीत दोन्ही देशांमधल्या ऐतिहासिक संबंधांना उजाळा दिला आणि द्विपक्षीय संबंध अधिक वृद्धिंगत करण्यासाठी वचनबद्धता व्यक्त केली. भारत आणि कुवेत यांनी द्विपक्षीय भागीदारी धोरणात्मक भागीदारीत रूपांतरित करण्याचं ठरवलं आहे, अशी माहिती मोदी यांनी समाजमाध्यमावर दिली आहे.

कुवेतमध्ये राहणाऱ्या सुमारे १० लाख भारतीयांची काळजी घेत असल्याबद्दल मोदी यांनी कुवेतच्या राजांचे आभार मानले तर कुवेतच्या प्रगतीत भारतीय समुदाय देत असलेल्या योगदानाचं कौतुक कुवेतच्या राजांनी केले. भारत हा कुवेत आणि आखाती देशांचा मोलाचा भागीदार असल्याचं ते म्हणाले.

मोदी यांना आज कुवेतच्या -'द ऑर्डर ऑफ मुबारक अल कबीर' या सर्वोच्च पुरस्कारानं सन्मानित करण्यात आलं. कुवेतचे अमीर शेख मेशल अल-अहमद अल-जबेर अल-सबाह यांनी त्यांना हा पुरस्कार प्रदान केला.

**<><><><><>**

भारत पुढल्या वर्षी कनिष्ठ गट नेमबाजी विश्वचषक स्पर्धेचं यजमानपद भूषवणार आहे. भारत प्रथमच या स्पर्धेचं यजमानपद भूषवणार असून पुढल्या वर्षाच्या उत्तरार्धात ही स्पर्धा होईल. भारतीय राष्ट्रीय रायफल संघ ही स्पर्धा आयोजित करणार असून यात रायफल, पिस्तूल आणि शॉटगन प्रकारात स्पर्धा होतील. गेल्या दशकभरात भारतात आयोजित ही नववी मोठी नेमबाजी अजिंक्यपद स्पर्धा आहे. यापूर्वी भारतानं आंतरराष्ट्रीय नेमबाजी क्रीडा महासंघाच्या सहा स्पर्धा आयोजित केल्या आहेत.

**<><><><><>**

सिंधुदुर्ग जिल्ह्यात कुडाळ मध्ये बॅरिस्टर नाथ पै शिक्षण संस्थेच्या संकुलात विधीसेवा आणि शासकीय सेवा योजनेच्या महाशिबिराचं आयोजन केलं होतं. मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती नितीन बोरकर यांनी या शिबिराचं उद्घाटन केलं. या महामेळाव्यात विविध योजनांच्या लाभयार्थ्यांना मान्यवरांनी लाभांचं वितरण केलं. सामाजिक आणि आर्थिक न्याय लोकांपर्यंत पोहोचला पाहिजे असं मत नितीन बोरकर यांनी व्यक्त केलं.

**<><><><><>**

गेल्या चोवीस तासात, मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात तुरळक ठिकाणी किमान तापमानात लक्षणीय वाढ झाली. राज्यात सर्वात कमी किमान तापमान नागपूर इथं ११ पूर्णांक ८ दशांश अंश सेल्सिअस इतकं नोंदवलं गेलं.

येत्या दोन दिवसात राज्यात सर्वत्र हवामान कोरडं राहण्याची शक्यता पुणे वेधशाळेनं व्यक्त केली आहे.

**//<><><><><>//**